पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.विधी समिती**

कार्यपत्रिका क्रमांक - ९

**सभावृत्तांत**

दिनांक - **१९/१२/२०१४** वेळ - दुपारी **१२.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची पाक्षिक सभा शुक्रवार दिनांक **१९/१२/२०१४** रोजी दुपारी **१२.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

१) **मा. पालांडे सुजाता सुनिल – सभापती**
२) मा. वसंत (नाना) आनंदराव लोंढे
३) मा. वाबळे संजय मल्हारराव
४) मा. सौ.ठाकरे मंदाकिनी अर्जुन
५) मा. बो-हाडे अरुण तुकाराम
६) मा. सौ.बनसोडे शकुंतला काशिनाथ
७) मा. मासुळकर समीर मोरेश्वर
८) मा. विमलताई सुरेश जगताप

याशिवाय मा.गावडे - सह आयुक्त, मा.डोईफोडे - सहा.आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.साळवी, मा.घोडे - कार्यकारी अभियंता हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभाकामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले.**

विषय क्र.२) जलक्षेत्र क्र.बी/२ अंतर्गत पुनावळे येथील उंच टाकीचे आऊटलेट हायवे क्रॉसिंग करुन जुन्या लाईनला जोडणेबाबत -

विषय क्र.३) कासारवाडी मैलाशुध्दीकरण केंद्रांतर्गत प्रभाग क्र.३७ महात्मा फुलेनगर येथे अंतर्गत जलनि:सारण नलिका टाकणेबाबत - मा.वसंत लोंढे, मा.मंदाकिनी ठाकरे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.४) ओमेगा रस्त्याच्या कामातून पिंक सिटी रस्ता डांबरीकरण करणेस परवानगी मिळेणेबाबत - मा.वसंत लोंढे, मा.मंदाकिनी ठाकरे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.५) भोसरी येथील कै.सिताराम लोंढे उद्यानाच्या सिमाभिंतीलगत छोटया व्यावसायिकांसाठी गाळे बांधणेबाबत - मा.वसंत लोंढे, मा.मंदाकिनी ठाकरे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.६) मोरवाडी प्रभाग क्र.३५ येथील कापसे उद्यानाची सिमाभिंत बांधणे ( उद्यान विकसीत करणे) कामाच्या वर्गीकरणाबाबत - मा.वसंत लोंढे, मा.मंदाकिनी ठाकरे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.७) कामाच्या जागेत बदल करणेबाबत - मा.वसंत लोंढे, मा.मंदाकिनी ठाकरे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.८) प्रभाग क्र.८ टेल्को रस्ता हॉटेल वैशाली जवळ तरंगत्या लोकसंखेसाठी स्वच्छतागृह बांधणेबाबत - मा.वसंत लोंढे, मा.मंदाकिनी ठाकरे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.९) मा.विधी समिती सदस्य यांचा अभ्यास दौरा आयोजित करणेबाबत - मा.मंदाकिनी ठाकरे, मा.शकुंतला बनसोडे यांचा प्रस्ताव.

----------

ठराव क्रमांक : ५९ विषय क्रमांक : १

दिनांक : १९/१२/२०१४ विभाग : विद्युत मुख्यालय

सुचक : मा.वसंत लोंढे अनुमोदक : मा.संजय वाबळे

संदर्भ : मा.सह शहर अभियंता यांचे पत्र क्र.मुका/वि/जा/७७२/२०१४, दि.१०/१२/२०१४

मा.सह शहर अभियंता यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मनपाच्या प्रशासकीय इमारतीमधील सभागृहातील ध्वनीक्षेपन व्यवस्थेची देखभाल दुरुस्ती करणेकामी २०१५-१६ करिता येणा-या र.रु.१४,००,०००/- (अक्षरी र.रु.चौदा लाख फक्त) चे पुर्वगनणपत्रकास व त्याप्रमाणे काम करण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक : ६० विषय क्रमांक : २

दिनांक : १९/१२/२०१४ विभाग : पाणीपुरवठा

सुचक : मा.वसंत लोंढे अनुमोदक : मा.मंदाकिनी ठाकरे

संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.पापु/बप्र/T.६४५५/४४/२०१४, दि.१९/११/२०१४

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

जलक्षेत्र क्र.बी/२ अंतर्गत पुनावळे येथील उंच टाकीचे आऊटलेट हायवे क्रॉसिंग करुन जुन्या लाईनला जोडणेकामी येणा-या र.रु.४७,८०,७४२/- ( अक्षरी र.रु.सत्तेचाळीस लाख ऐंशी हजार सातशे बेचाळीस फक्त ) चे पुर्वनगणपत्रकास व त्याप्रमाणे काम करण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : ६१ विषय क्रमांक : ३

दिनांक : १९/१२/२०१४

सुचक : मा.वसंत लोंढे अनुमोदक : मा.मंदाकिनी ठाकरे

संदर्भ : मा.वसंत लोंढे, मा.मंदाकिनी ठाकरे यांचा प्रस्ताव -

प्रभाग क्र.३७ येथे बालाजीनगर झोपडपट्टी असून सदर झोपडपट्टीत सार्वजनिक शौचालये अपुरी आहेत. त्यामुळे तेथील झोपडीधारक उघडयावर जातात त्यामुळे सदर ठिकाणी

अनारोग्य परिस्थिती निर्माण होत आहे. सदर झोपडीधारकांना वैयक्तीक शौचालय बांधणेसाठी प्रोत्साहन देण्यासाठी झोपडपट्टीत अंतर्गत रस्त्यावर जलनि:सारण नलिका टाकणे आवश्यक आहे. तरी सदरचे काम कासारवाडी मैला शुध्दीकरण केंद्रांतर्गत प्रभाग क्र.३७ महात्माफुलेनगर येथे अंतर्गत जलनि:सारण नलिका टाकणे कामातून करुन घेणेस येणारा सुधारित अंदाजित र.रु.४९,५०,०००/- (अक्षरी र.रु.एकोणपन्नास लाख पन्नास हजार फक्त) चे सुधारित प्रशासकीय खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : ६२ विषय क्रमांक : ४

दिनांक : १९/१२/२०१४

सुचक : मा.वसंत लोंढे अनुमोदक : मा.मंदाकिनी ठाकरे

संदर्भ : मा.वसंत लोंढे, मा.मंदाकिनी ठाकरे यांचा प्रस्ताव -

प्रभाग क्र.५३ मधील वाकड थेरगांव रस्त्यावरील ओमेगा सोसायटी पासून पश्चिम बाह्य महामार्ग पर्यंतचा २४ मी.डी.पी. रस्ता विकसीत करणे याचे काम जवळपास ८०% पुर्ण झाले असुन सदर कामात निविदा रक्कम शिल्लक राहत आहे. तसेच सदर प्रभागातील कावेरीनगर ते ४५ मी.बी.आर.टी.एस. रस्ता (पिंक सिटी रस्ता) हा अत्यंत खराब झाला असल्याने सदर ठिकाणच्या नागरिकांचे वाहतुक विषयी तक्रारींचे निराकरण करणेकामी ओमेगा रस्त्याच्या कामातून पिंकसिटी रस्ता डांबरीकरण करणेस, रस्त्याच्या शिल्लक कामातून सदर रस्त्याचे डांबरीकरण करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : ६३ विषय क्रमांक : ५

दिनांक : १९/१२/२०१४

सुचक : मा.वसंत लोंढे अनुमोदक : मा.मंदाकिनी ठाकरे

संदर्भ : मा.वसंत लोंढे, मा.मंदाकिनी ठाकरे यांचा प्रस्ताव -

वॉर्ड क्र.३५ भोसरी गावठाण या प्रभागामध्ये बरेच छोटे व्यवसायिक फुटपाथवर किंवा रस्त्यावर व्यवसाय करत आहेत. त्यामुळे रस्त्यावर कोंडी होते. यावर कायमस्वरुपी उपाय काढण्याच्यादृष्टीने भोसरी येथील कै.सिताराम लोंढे उद्यानाच्या सिमाभिंतीच्या कडेने व पीएमटी चौक येथे छोटया व्यवसायिकांसाठी २.६० मी. X १.७२ मी. या साईजचे गाळे भाडेतत्वावर बांधल्याने रस्त्यावरील व्यवसायिकांसाठी गाळयामध्ये जागा देता येईल व रस्त्यावर वाहतुकीची कोंडी होणार नाही. तसेच मनपाच्या उत्पन्नात देखील भर पडेल. त्यामुळे छोटया व्यवसायिकांसाठी गाळे बांधणे आवश्यक आहे. या कामासाठी र.रु.३५,००,०००/- एवढा खर्च येईल. सबब या कामासाठी येणा-या र.रु.३५,००,०००/- (अक्षरी र.रु.पस्तीस लाख फक्त) चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : ६४ विषय क्रमांक : ६

दिनांक : १९/१२/२०१४

सुचक : मा.वसंत लोंढे अनुमोदक : मा.मंदाकिनी ठाकरे

संदर्भ : मा.वसंत लोंढे, मा.मंदाकिनी ठाकरे यांचा प्रस्ताव -

मोरवाडी वॉर्ड क्र.३५ येथील सिमाभिंतीचे काम पूर्ण करण्यात आले आहे. सदर ठिकाणी मनपा मार्फत अन्य योजना (पर्यटन विकास आराखडा) राबविण्यात येणार असल्याने त्या वॉर्ड मधील उद्यान विकसित करण्याचे काम होऊ शकणार नाही. ह्या कामांतर्गत मनपा क्षेत्रातील उद्यानांची स्थापत्य विषयक कामे करणे आवश्यक आहे. तरी ह्या कामाची प्रत्यक्षात येणारी उर्वरित रक्कम मनपाच्या उद्यानाच्या अन्य क्षेत्रात विनियोग करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : ६५ विषय क्रमांक : ७

दिनांक : १९/१२/२०१४

सुचक : मा.वसंत लोंढे अनुमोदक : मा.मंदाकिनी ठाकरे

संदर्भ : मा.वसंत लोंढे, मा.मंदाकिनी ठाकरे यांचा प्रस्ताव -

प्रभाग क्र.३८ नेहरुनगर मध्ये वॉर्ड क्र.३० नेहरुनगर नुरमोहल्ला येथील नाल्यालगत अस्तित्वातील १२ सिटसचे शौचालय पाडून नविन १० सिटसचे संडासब्लॉक बांधणे हे निविदा क्र.३२/१३ २०१३-१४ र.रु.१८,५७,१४०/- (अक्षरी र.रु.अठरा लाख सत्तावन्न हजार एकशे चाळीस फक्त) हे निविदेचे काम काढण्यात आले होते. परंतु सदर ठिकाणी स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार संडासब्लॉकची आवश्यकता नाही. तरी वरील कामाऐवजी नेहरुनगर मधील नाल्यांची दुरुस्ती करणे व चौक सुशोभिकरण करणेचे काम करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : ६६ विषय क्रमांक : ८

दिनांक : १९/१२/२०१४

सुचक : मा.वसंत लोंढे अनुमोदक : मा.मंदाकिनी ठाकरे

संदर्भ : मा.वसंत लोंढे, मा.मंदाकिनी ठाकरे यांचा प्रस्ताव -

प्रभाग क्र.८ टेल्को रस्ता हॉटेल वैशाली जवळ तरंगत्या लोकसंख्येसाठी स्वच्छतागृह बांधणेचे काम प्रस्तावित करणेत आलेले आहे. परंतु सदर ठिकाणी संडासब्लॉकचा वापर अजिबातच होणार नाही त्या ठिकाणी नागरीवस्ती नाही किंवा तरंगती लोकसंख्या देखील नाही. उलट त्या ठिकाणी संडासब्लॉक बांधल्यास त्याचा दुरुपयोगच होईल. सदर ठिकाणी संडासब्लॉक न बांधता अतिशय आवश्यकता असलेल्या परशुराम झोपडपट्टी या ठिकाणी संडासब्लॉक बांधावा जेणेकरुन त्याचा पुरेपुर उपयोग होईल. सदरची बाब दि.१३/११/२०१४ च्या मा.आयुक्त यांचे वॉर्ड पाहणी दौ-यात निदर्शनास आणून दिलेली आहे. सदर वॉर्डमध्ये परशुराम चौकालगत असलेल्या परशुराम झोपडपट्टी मध्ये अस्तित्वात असलेल्या संडासब्लॉकचा परिसरातील नागरिक वापर करीत आहेत. तथापि सदर संडासब्लॉक कमी सिट्सचा असल्याने नागरिकांची गैरसोय होत आहे. त्यामुळे बरेचसे नागरिक उघडयावर शौचास बसत आहेत. परिणामी परिसरामध्ये नागरिकांचे

आरोग्याचा प्रश्न निर्माण होत आहे. सदर संडासब्लॉकची क्षमता वाढविणे आवश्यक असल्याने विषयांकित संडासब्लॉक हॉटेल वैशाली जवळील जागेत बांधणे ऐवजी परशुराम झोपडपट्टी या ठिकाणी बांधणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : ६७ विषय क्रमांक : ९

दिनांक : १९/१२/२०१४

सुचक : मा.मंदाकिनी ठाकरे अनुमोदक : मा.शकुंतला बनसोडे

संदर्भ : मा.मंदाकिनी ठाकरे, मा.शकुंतला बनसोडे यांचा प्रस्ताव -

मा.विधी समिती सदस्यांचा केरळ अभ्यास दौरा आयोजित करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

( **पालांडे सुजाता सुनिल** )
**सभापती**
विधी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/१०१५/२०१४
दिनांक : ०२/०१/२०१५



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

\\172.16.0.152\e\e drive\Nagersachiv1\Vidhi-14-15\proceeding 9_Vidhi.doc